# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- १८१ /२०२०**

**तक्रारकर्ता - श्रीमती श्रध्दा विजय कदम,**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी के/पश्चिम,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त के/प विभाग कार्यालय,
बी.ई.एस.टी.डेपोसमोर पालीराम पथ, अंधेरी (प) मुंबई -४०० ०५८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त के/प विभाग कार्यालय,
बी.ई.एस.टी.डेपोसमोर पालीराम पथ, अंधेरी (प) मुंबई -४०० ०५८.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २०.११.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु. मा. आ. नों. क्र. ४१११/२०१८ रा. मा. आ. १५८३/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. ०६.०३.२०२० रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

"अपिलार्थी यांनी दाखल केलेले द्वितीय अपील अर्ज कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून रुपांतरित करण्यात येत आहेत."

२. उक्त तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी के/पश्चिम बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग, अंधेरी (प) मुंबई ४०० ०५८ यांच्याकडून दि.२४.०९.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला होता. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी के/पश्चिम बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग, अंधेरी (प) मुंबई ४०० ०५८ यांनी दि. २८.१०.२०२० रोजीच्या पत्रानुसार आयोगास अहवाल सादर केला.

३. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, तक्रारकर्ता यांनी सुरुवातीस माहिती अर्ज करताना व्यक्तीचे मृत्यूचे साल नमूद केले नसल्याने माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. परंतु सन २०१९ मध्ये व्यक्तीचे मृत्यूचे साल सन १९७८ असे नमूद केले. आयोगाच्या अभिलेखावरुन असे निदर्शनास येते की, तक्रारकर्ता यांना नेमकी मृत्यूच्या तारीखेची माहिती नाही. बहुतेक संबंधितांचा मृत्यू दि. १५.०९.१९७८ पासून ते दि. ३१.१०.१९७८ दरम्यान जे जे हॉस्पिटल येथे झाल्याचे दिसून येते. सदर नोंदीवरुन मृत्यू प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले होते किंवा नाही याबाबत स्पष्टता नाही.

..२/-

४. जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणी पूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आयोगास आणखी वेळेची मागणी केली.

जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०७.०१.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २१.११.२०२५**